# मराठी विश्व, न्यू जर्सी- मधे रंगला 'मराठी अस्तित्व' कार्यक्रम

- **निर्मल देव** (ग्रीन ब्रूक, न्यू जर्सी)

मराठी विश्व, न्यू जर्सी यांनी नुकताच एक कार्यक्रम आयोजित केला होता - 'मराठी अस्तित्व'! केवळ नावावरून कार्यक्रम काय असेल याचा उलगडा जरी होत नसला तरी काही लोकांनी हा कार्यक्रम आधी पाहिला होता व खूप कौतुकही केले होते, त्यामुळे उत्सुकता खूपच होती. कार्यक्रम सुरू होण्याअगोदरच साऊंड सिस्टिममध्ये काही अडचणी आल्या, तरी प्रेक्षक थांबले होते, आणि त्या प्रतिक्षेचे सार्थक झाले. सर्वच कलाकार अतिशय गुणी होते आणि प्रत्येकाने आपापल्या भूमिकेला संपूर्ण न्याय दिला. मराठी भाषा कशी सर्वंकष आहे याचा पूर्ण प्रभाव हा कार्यक्रम बघताना आला.



कार्यक्रमाचे संचालन, संकल्पना आणि निवेदन सौ. मानसी जोशी-बेडेकर यांनी किती सहजपणे केलं होतं हे पाहून थक्क व्हायला झालं. दिग्दर्शनसुध्दा सौ मानसी त्यांनी श्री. श्रेयस बेडेकर यांच्यासह केले होते. निवडलेली सर्वच गाणी प्रसंगानुरूप होती. गाण्याबरोबर शिवाजी महाराजांचे चित्र रेखाटन बघताना अंगावर काटा उभा राहिल्याशिवाय राहत नाही. कार्यक्रम सुंदर व्हावा यासाठी घेतलेले अपार परिश्रम दिसून येत होते. नाटकाच्या संगीताची बाजू श्री सत्यजित प्रभू यांनी समर्थपणे सांभाळली होती. त्यांना भारतातील "Number one keyboardist " का म्हणतात हे कळून आलं. संपूर्ण कार्यक्रम एक क्षणही कंटाळवाणा झाला नाही; उलट, सुरुवात उशिरा झाली असली तरी कार्यक्रम आणखी थोडा वेळ चालू राहावा असेच वाटत होते.

मराठी अस्तित्व टीमचे कौतुक करावे तेवढे थोडेच! सर्व कलाकारांना खूप, खूप शुभेच्छा आणि मराठी विश्वने इतका छान कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल त्यांचे धन्यवाद! तुम्हा कोणाला हा कार्यक्रम बघायची संधी मिळाली, तर नक्कीच ती संधी सोडू नका!

***